# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 29.04.2025** **वार - मंगळवार**

---

**मंत्रीमंडळ**

राज्य मंत्रीमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत टेमघर प्रकल्पाच्या उर्वरित कामांसाठी आणि गळती प्रतिबंधक कामाच्या सुधारित खर्चाला मान्यता देण्यात आली. हडपसर ते यवत राज्य मार्गाचं सहा पदरी बांधकाम आणि या रस्त्यावरील सहा पदरी उन्नत मार्गालाही मंत्रीमंडलानं मंजूरी दिली.

**रक्तदान**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या वर्धापन दिनानिमित्त पुणे स्टेशन आगारात ससून सर्वोपचार रुग्णालयाच्या सहकार्यानं आज आयोजित रक्तदान शिबिरात 101 कर्मचाऱ्यांनी रक्तदान केलं. यामध्ये जमा झालेलं रक्त गरजू आणि गरीब आणि रुग्णांसाठी वापरलं जाणार आहे. यावेळी 15 ते 20 लाखांचं उत्पन्न देणाऱ्या 20 उत्कृष्ट वाहकांचा महामंडळाच्या अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉक्टर दीपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते  गौरव करण्यात आला.

**स्वच्छगाव**

पुणे जिल्ह्यात येत्या 1 मे ते 30 सप्टेंबरपर्यंत “कंपोस्ट खड्डा भरु, आपलं गाव स्वच्छ ठेवू” ही मोहीम सर्व ग्रामपंचायती आणि महसुली गावांमध्ये राबवणार असल्याचं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं.  ग्रामीण भागातील गावांना स्वच्छतेचा अपेक्षित दर्जा मिळवून देणं, स्वच्छतेच्या सवयींबाबत ग्रामस्थांमध्ये बदल घडवून आणणं, कचरा व्यवस्थापनात पर्यावरणपूरक सुधारणा करणं, कचरा कमी करणं आणि कचऱ्याचा पुनर्वापर अशी या अभियानाची उद्दिष्टं आहेत.

**दूध**

पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या वतीनं जिल्ह्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध दर फरकापोटी 6 कोटी 43 लाख 46 हजार रुपयांची रक्कम मार्च महिन्यातील दूध देयकांबरोबर थेट बँक

खात्यात वितरित करण्यात आली आहे. भविष्यातही दूध संघ अधिक व्यापक पातळीवर काम करून राज्यात एक आदर्श संस्था म्हणून नावारूपाला येईल असं अध्यक्ष स्वप्नील ढमढेरे यांनी सांगितलं.

**वाहतूक बदल**
अक्षय्य तृतीयेनिमित्त उद्या दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात आंबा महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. मंदिरात दर्शनासाठी होणारी भाविकांची गर्दी लक्षात घेऊन या भागातील वाहतूक इतर मार्गानं वळवण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करावा असं वाहतूक विभागानं कळवलं आहे.

**प्रकल्प**
पिंपरी चिंचवड महापालिकेनं निगडी इथं 15 मिनिटं शहर संकल्पनेसाठी हा पथदर्शी प्रकल्प सुरू केला आहे. या उपक्रमाची अंमलबजावणी महापालिकेच्या नव्यानं स्थापन केलेल्या शहरी दळणवळण विभागाच्या माध्यमातून केली जात आहे. सध्या प्रायोगिक तत्वावर सुमारे 100 मीटर लांबीचा रस्ता विकसित करण्यात आला आहे. यामध्ये पायी चालणे, सायकलिंग आणि पावसाचं पाणी व्यवस्थापन यासंबंधी असलेल्या नव्या शहरी धोरणांचा समावेश आहे. या उपक्रमाच्या अंतर्गत, महापालिका 2026 अखेरीस 9 किलोमीटर सुरक्षित आणि सुलभ चालण्याच्या आणि सायकलिंगच्या मार्गांचा विकास करण्यावर भर देणार आहे.

**कॅशलेस**
रोख-विरहित व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागानं शहरातील 10 उद्यानं आणि इतर सुविधांमध्ये प्रवेश शुल्क भरण्यासाठी पीओएस मशिन बसवली आहेत. यामुळे प्रत्येक रक्कमेची नोंद राहील आणि व्यवहार पारदर्शक होतील अशी माहिती उद्यान विभागाचे सहायक आयुक्त उमेश ढाकणे यांनी दिली.

**रस्ते**
पुणे शहरातील सुस्थितीतील रस्ते खोदणाऱ्या संबंधित ठेकेदार, बांधकाम व्यवसायिक आणि हे काम करायला लावणाऱ्या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेचे उपायुक्त आणि पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी दिली. पथ विभागानं गेल्या महिन्यात कोट्यवधी रुपये खर्चून शहरातील 15 रस्त्यांची डागडुजी केली होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शहरातील सुस्थितीत असलेले रस्ते खोदण्याचं काम सुरु आहे.

**आयुक्त**
पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून ओमप्रकाश दिवटे यांची राज्य सरकारनं नियुक्ती केली आहे. या नियुक्तीमुळं महापालिकेतील अतिरिक्त आयुक्तांची तिन्ही पदं भरली गेल्यानं प्रशासकीय कामाला गती येण्याची अपेक्षा आहे.

**पुरस्कार**
भारतीय संगीत प्रसारक मंडळाच्या पुण्यातील गांधर्व महाविद्यालयाच्या 93 व्या वर्धापन दिनानिमित्त पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर स्मृती गुरू गौरव पुरस्कार शास्त्रीय गायिका आणि गुरू डॉक्टर माधुरी डोंगरे यांना प्रदान केला जाणार आहे. यानिमित्त उद्यापासून तीन दिवस सुबद्ध संगीत महोत्सव आयोजित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य पंडित प्रमोद मराठे यांनी दिली.

**पुरस्कार**
पुण्यातील राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेचे इंग्रजी भाषा आणि प्रसारमाध्यम विभाग प्रमुख डॉ. अरुण सांगोलकर यांना नुकताच 'महात्मा गांधी एज्युकेशनल रिसर्च एक्सलन्स अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रामधल्या उत्कृष्ट कार्यासाठी हा पुरस्कार दिला जातो.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**.